# वालीचा वध

श्रीराम आणि सुग्रीव मित्र झाले. त्यांनी एकमेकांना साहाय्य करण्याचे वचन दिले. रामाने सुग्रीवाला वचन दिले की तो सुग्रीवाचे राज्य त्याला परत मिळवून देईल. सुग्रीवाने रामाला वचन दिले की तो सीतेच्या शोधात साहाय्य करेल.

रामाने सुग्रीवाला सांगितले की किष्किंधेला जाऊन वालीला युद्धासाठी आह्वान दे. त्याप्रमाणे सुग्रीव किष्किंधेला गेला. त्याने वालीला आह्वान दिले. वाली शूर होता. त्याने युद्धाचे आह्वान स्वीकारले. वाली आणि सुग्रीवाचे द्वंद्व सुरु झाले. काही काळाने सुग्रीवाची शक्ती कमी होऊ लागली. वालीचा विजय होऊ लागला. तेव्हा रामाने वालीवर एक बाण सोडला. तो बाण लागून वाली खाली कोसळला.

वालीने श्रीरामाला विचारले, “तुमचे आणि माझे तर काही वैर नव्हते. मग तुम्ही असे लपून मला का मारले?”

तेव्हा श्रीराम म्हणाले, ”सुग्रीव तुझा लहान भाऊ आहे. त्याच्यावर तू अन्याय केलास. त्याला राज्याबाहेर घालवलेस. त्याच्या पत्नीचे हरण केलेस. एका राजाने असे करणे योग्य नाही. तू अधर्माने वागलास म्हणून मी तुला मारले.”


वालीला पश्चात्ताप झाला. त्याने सुग्रीवाची क्षमा मागितली आणि प्राण सोडले. वालीच्या मृत्यूने सर्वांना फार दुःख झाले.

नंतर सुग्रीव किष्किंधेचा राजा झाला. वालीचा मुलगा अंगद युवराज झाला. असेच काही महिने गेले. त्यानंतर सुग्रीवाने सीतेच्या शोधाची तयारी सुरु केली. त्याने सर्व दिशांना आपले वानर सैन्य पाठवले. दक्षिण दिशेला त्याने आपले सर्वात बुद्धिमान आणि सामर्थ्यवान वानर पाठवले. त्यात नील, अंगद, जाम्बुवान आणि हनुमान होते.

हनुमान आणि इतर वानर सीतेचा शोध घेत निघाले. त्यांनी अनेक पर्वत, नद्या आणि अरण्ये पार केली. अखेर ते दक्षिण टोकाला समुद्राच्या किनाऱ्यावर आले. परंतु त्यांना सीता सापडली नाही. “आता काय करायचे” अश्या चिंतेत ते सारे बसले होते. तेवढ्यात तेथे संपाति नावाचा एक वृद्ध गिधाड आला. संपाति हा जटायूचा भाऊ होता. त्याला समजले की रावणाने जटायूला मारून सीतेचे हरण केले आहे, आणि ही वानर मंडळी सीतेचा शोध घेत आहेत.

संपाति खूप दूरचे पाहू शकत होता. त्याने सांगितले की या समुद्राच्या पलिकडे लंका नावाचे बेट आहे. तेथेच रावणाने सीतेला बंदी करून ठेवले आहे.

सीता कुठे आहे हे समजल्याने वानरांना खूप आनंद झाला. पण हा समुद्र पार करून लंकेत कसे जायचे या विचाराने त्या सर्वांनाच खूप चिंता वाटू लागली.



1. राजाचा धर्म काय आहे? (पुढील शब्द वापरून वाक्ये तयार करा: न्याय, रक्षण, शिक्षा)

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

2. विद्यार्थ्यांचा धर्म काय आहे? (पुढील शब्द वापरून वाक्ये तयार करा: अभ्यास, आदर, व्यायाम)

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

3. खालील प्रयोग वापरून वाक्ये करा:

(वचन देणे, आह्वान देणे, क्षमा मागणे, शोध घेणे, पार करणे)

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

शिक्षकांसाठी:

- वाली, हनुमान, संपाति यांच्या गोष्टी वर्गात सांगा.
- प्रत्येकाचा धर्म कसा वेगळा असू शकतो यावर चर्चा करा.